महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती


मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८१ वे | दिनांक : १४/०३/२०२६ | वार : शनिवार


## नरेंद्र मोदी पूर्णपणे कॉम्प्रोमाइज झालेत : देशाच्या विरोधात निर्णय घेत आहेत, प्रकाश आंबेडकर



**छत्रपती संभाजीनगर** : इराण-अमेरिका व इस्राइल युद्ध सुरू आहे. या युद्धाच्या झळा भारतालाही काही प्रमाणात बसत असल्याचे दिसत आहे. या मुद्द्यावरून विरोधकांनी संसदेत सरकारची चांगलीच गोची केली आहे. एपस्टीन फाइलवरून देखील कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेत मोदींवर टीका केली आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत कॉंग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ होते. तसेच आम आदमी पक्षाचे प्रतिनिधी होते व काही डाव्या पक्षांचे प्रतिनिधी होते. आता आम्ही २३ तारखेला आरएसएसच्या कार्यालयावर मोर्चा आयोजित केला असल्याची माहिती दिली.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, स्वातंत्र्याच्या लढ्यात आरएसएसची कोणतीही भूमिका नव्हती. तो सामाजिक लढा असेल किंवा राजकीय असेल. आरएसएस तुम्ही भूमिका का घेत नाही? ज्याचे चारित्र्य चांगले नाही असा पंतप्रधान तुम्हाला चालतो का? पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पूर्णपणे कॉम्प्रोमाइज झाले आहेत आणि कॉम्प्रोमाइज झाल्यामुळे त्यांनी देशाच्या विरोधात निर्णय घ्यायला त्यांनी सुरुवात केली आहे. एपस्टीन फाइलमध्ये नरेंद्र मोदी यांचे नाव आले आहे आणि त्यांनी देशाचे सार्वभौम हे एका प्रकारे किंवा अमेरिकेसमोर गहाण ठेवले आहे, अशी परिस्थिती आहे.

नरेंद्र मोदी यांनी खाडी युद्धात भारतावर सार्वभौम नाही तर आमची सत्ता आहे, आम्ही सांगू तेच भारत करेल असे दाखवण्यासाठी अमेरिकाने नरेंद्र मोदी यांना मुभा काय दिली तर रशियाकडून तुम्ही तेल विकत घेऊ शकता. अगोदरचे आदेश बंद करा, आत्ताचे आदेश तुम्ही विकत घेऊ शकता, आणि नरेंद्र मोदी हे कॉम्प्रोमाइज झाले आहेत आणि अमेरिकेसमोर नरेंद्र मोदी नाचत आहेत अशीच ही परिस्थिती आहे, अशी खोचक टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.दरम्यान, परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी आज औरंगाबाद खंडपीठात सुनावणी पार पडली. या सुनावणीसाठी प्रकाश आंबेडकर हे छत्रपती संभाजीनगर येथे आले होते.

## ॲट्रोसिटीच्या कायद्यात आता गुन्हा सिद्ध झाला तरच अटक - मंत्री संजय शिरसाट



**मुंबई** : विधानपरिषदेत बोलताना 'ॲट्रोसिटी' केस संदर्भात सामाजिक न्याय मंत्री व शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. पूर्वी 'ॲट्रोसिटी'चा गैरवापर केला जात असे. म्हणून आपण या कायद्यात बदल केले. आता 'ॲट्रोसिटी'अंतर्गत 'एफआयआर' दाखल झाल्यावरही समितीतर्फे चौकशी होते, गुन्हा सिद्ध झाला तरच अटक करण्यात येते अन्यथा 'एफआयआर' रद्द होतो. कोणावरही विनाकारण अन्याय होऊ नये, हा यामागील उद्देश आहे, अशी माहिती संजय शिरसाट यांनी दिली आहे.

विधानपरिषदेत बोलताना संजय शिरसाट म्हणाले, पूर्वी 'ॲट्रोसिटी'चे गुन्हे सर्रासपणे दाखल केले जायचे, हे काही अंशी खरे आहे. एखाद्याने शिवी दिली असे म्हणून जरी आपण पोलिस स्टेशनमध्ये गेलो, तर आपल्यावर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल व्हायचा. आता गुन्हा दाखल केला की तातडीने आरोपीला २४ तासांच्या आत अटक झाली पाहिजे असा सुद्धा पूर्वी नियम होता आणि त्या पद्धतीने काही लोकांना अटक केलीही जायची. परंतु, याचा काही ठिकाणी गैरवापर निश्चित झालेला आहे हे नाकारता येत नाही. म्हणून आता शासनाने या कायद्यात बदल नोंदवलेला असल्याची माहिती शिरसाट यांनी दिली.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, आता शासनाने या कायद्यात बदल सांगितला आहे. यात काय सांगितले आहे की, तुम्हाला तुमचा एफआयआर नोंदवता येईल. परंतु, अटक करण्यापूर्वी जो आयओ असेल तो त्याची खात्री करेल. आयओने खात्री केली, पोलिसांकडे जर तो चुकीचा गुन्हा दाखल झाला असेल तर कलम १६९ नुसार पोलिसांकडे तो समरी देतो आणि त्यानंतर पहिली जी काही कोर्टात हे प्रकरण येते तेव्हा आहे समरी त्याला जोडली जाते आणि ती केस मागे घेतली जाते, अशी माहिती शिरसाट यांनी दिली.

आता माझे त्याहीपुढे असे म्हणणे आहे की चुकीचे गुन्हे कोणावर दाखल होऊ नये. अन्याय झाला असेल तर निश्चित झाला पाहिजे. गुन्हा दाखल झालाच पाहिजे. परंतु, असे कोणी करत असेल तर त्याला सुद्धा कायद्यात काही करता येईल का, यावर शासन सुद्धा निर्णय घेईल. परंतु, आता तातडीने अटक करण्याची जी काही पद्धत होती, ती आता थांबलेली आहे, असेही संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत बोलताना म्हटले आहे.

## आरोग्य सुविधांची कामे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या समन्वयाने करा : आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**हिंगोली** : सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत सुरु असलेली बांधकामे व इतर आरोग्य सुविधांची कामे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या समन्वयाने करावीत असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी दिले आहेत.

राज्याच्या विविध भागातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत मंत्रालयातील समिती सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत हुडको अंतर्गत राज्यभर सुरु असलेली बांधकामे व इतर आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. बैठकीला आमदार प्रकाश सोळंकी, आमदार सुरेश धस, आमदार सरोज अहिरे, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार नारायण पाटील, आमदार सुहास बाबर, आमदार अमोल खताळ, आमदार गोपीचंद पडळकर,आमदार आमशा पाडवी, आमदार मंजुळाताई गावित, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आमदार उमेश यावलकर, आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई.रवींद्रन, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट विंग (IDW) चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, व संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.

यावेळी मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, ज्या आरोग्य संस्थांच्या पायाभूत सुविधांची ८० टक्के बांधकामे पूर्ण झाली आहेत. त्यांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून लोकार्पणासाठी सज्ज कराव्यात, तसेच ५० टक्के बांधकामे पूर्ण झालेल्या संस्थांच्या मनुष्यबळा संबंधीचे प्रस्ताव सादर करावेत.

आरोग्य संस्था मधील रिक्तपदे भरताना नक्षलग्रस्त, आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भागातील रिक्त जागा प्राधान्याने भरण्यात याव्यात. नवीन पदभरती, पदोन्नती, व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दुर्गम व ग्रामीण भागात प्राधान्याने नियुक्त करावे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आपल्या कार्यक्षेत्रात बाह्य स्तोत्राद्वारे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे वेतन दिले जाते का याची पडताळणी करावी. रुग्णालय व परिसरातील स्वच्छता तसेच सकस आहाराबाबतीत नियमांचे काटेकोर पालन करावे. आपली बांधिलकी जनतेशी असून, ठेकेदारांच्या कामाचा दर्जा व गुणवत्ता तपासूनच बिले अदा करावीत. याबाबत तक्रार आल्यास कोणाची गय केली जाणार नाही.

यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने आरोग्य संस्था अधिक सक्षम कराव्यात. स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधींची मदत घ्यावी. तसेच लोकप्रतिनिधींच्या संपर्कात राहून समन्वयाने नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीदरम्यान विविध लोकप्रतिनिधीनी आपल्या मतदारसंघातील आरोग्य सुविधा विषयक मागण्या मांडल्या. आमदार श्रीजया चव्हाण यांनी, आरोग्य केंद्रात विशेषतज्ञ डॉक्टराबरोबरच जनरल फिजिशियन देण्याची, व डायलिसिस सेवा सुरू करण्याची मागणी केली. आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर येथील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. आमदार सुहास बाबर यांनी पारे (विटा) येथील आरोग्य संस्थेतील रिक्त पदे भरण्याची मागणी केली. आमदार सरोज अहिरे यांनी गिरणारे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरणे, तसेच सोनोग्राफी मशीनसाठी पूर्णवेळ तंत्रज्ञ उपलब्ध करून देणे व भगूर येथील रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

आमदार प्रकाश सोळंके वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीचा बाबत व सुरेश धस, आमदार नारायण पाटील, यांनी पदनिर्मिती, बांधकाम प्रस्तावाबाबत सूचना मांडल्या. आमदार उमेश यावलकर यांनी ब्लड स्टोरेज युनिटची मागणी केली. आमदार मंजुळाताई गावित यांनी आरोग्य सुविधांबाबत मुद्दे उपस्थित केले. आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी गडचिरोली जिल्ह्यात टीबी रुग्णालय उभारणे, मलेरिया विभागासाठी पूर्णवेळ अधिकारी नेमणे, आयसीयु मध्ये दर्जेदार औषधे उपलब्ध करून द्यावीत,कर्मचाऱ्याना नियमित प्रशिक्षण द्यावे तसेच गडचिरोली येथील सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरण करू नये, अशी सूचना केली. आमदार गोपीचंद पडळकर यांनी आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जाहिरातीच्या अनुषंगाने बिंदू नामावली तपासून पाहण्याची मागणी केली.तसेच ठाणे व पालघर जिल्हा रुग्णालय तसेच मनोर रुग्णालयाच्या लोकार्पणाच्या अनुषंगाने बैठकीत आढावा घेतला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ मार्च २०२६


## श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात "सायबर क्राईम" वर कार्यशाळा संपन्न




**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार १३ मार्च रोजी समाजशास्त्र विभागाच्या वतीने "सायबर क्राईम" वर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उद्घाटक आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून उमरगा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.श्री.प्रल्हाद सुर्यवंशी हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात मा.श्री.प्रल्हाद सुर्यवंशी यांनी "सायबर क्राईम" विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाईन व्यवहार वाढले असले तरी प्रत्येक व्यक्तीकडे ऑनलाईन व्यवहाराविषयीचे अज्ञान मोठ्या प्रमाणात आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती कधी ना कधी सायबर गुन्ह्यांला बळी पडू शकते. त्यामुळे सर्व व्यक्तीने सावध राहून संगणक व मोबाईल हाताळला पाहिजे. इंटरनेट, संगणक,मोबाईल किंवा डिजिटल उपकरणाचा वापर करुन केलेला कोणताही बेकायदेशीर गुन्हा म्हणजे सायबर क्राईम असून, पुढे बोलताना या डिजिटल युगात व्हॉट्सअँप इन्स्टाग्राम, फेसबुक च्या माध्यमातून मुलींची कशी फसवणूक केली जाते हे त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले.तरुणांने अनावश्यक अॅपचा वापर टाळून,ऑनलाईन गेम्स पासून दूर राहिले पाहिजे.कोणत्याही अनावश्यक लिंक ओपन करू नये,आलेला ओटीपी कुणालाही शेअर करू नये,अन्यथा फार मोठी फसवणूक होऊ शकते. असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात डॉ.सुर्यकांत रेवते आणि डॉ.संतोष सुरवसे यांनी हॅकिंग, फिशिंग, सायबर बुलिंग आणि मालवेअर हल्ला याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांनी सायबर क्राईम पासून कसा बचाव करावा हे सांगून अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट,अनोळखी लिंक, बँक पासवर्ड यापासून विद्यार्थ्यांनी सावध राहावे, असे सांगितले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ.पद्माकर पिटले, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रदीप पाटील, डॉ.ज्ञानोबा पडोळे, डॉ. सुमेध राजूरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.सैफ इनामदार यांनी, सुत्रसंचालन कु.अनिषा सुरवसे तर आभार प्रदर्शन डॉ.सुमेध राजूरकर यांनी केले. कार्यशाळेस सर्व प्राध्यापक, कर्मचारी व समाजशास्त्र विषयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# नवतंत्रज्ञान आत्मसात केले नाही तर आपण आउटडेटेड होऊ




**जालना** : मॅजिक इनक्युबेशन सेंटर व बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचा समारोप आज झाला. भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्सी हा गेमचेंजर होणार आहे. आपण केलेल्या प्रकल्पाचे रूपांतर उत्पादनात परावर्तित झाले पाहिजे. शिक्षक म्हणून आपली भूमिका पार पाडताना विद्यार्थ्यांच्या कलागुण कौशल्याला आपण प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. समाज घडविण्याची जबाबदारी ही शिक्षकावर आहे. येणाऱ्या युगात सतत शिकत राहणं हे महत्त्वाचं आहे. आपण नवीन काही शिकलो नाही तर आपला येणाऱ्या काळात टिकाव लागणार नाही. मी स्वत:ला सतत अपडेट करणे गरजेचे आहे. स्वतः शिकत राहिल्यामुळे इतरांना आपणाला मार्गदर्शन करता येईल नाहीतर आपण आउटडेटेड होऊ. विद्यार्थ्यांमधील स्पार्क आपण ओळखला पाहिजे. विद्यार्थ्यांसोबत जेवढे तुमची स्नेहपूर्ण संबंध असेल तेवढ्या प्रमाणात विद्यार्थी तुम्हाला कळतील. शिकण्याची वृत्ती आपण बाळगली पाहिजे. एकमेकाला प्रोत्साहन देऊन ज्ञानाची देवाण-घेवाण आपण केली पाहिजे. विद्यार्थ्यांना सुद्धा वाटलं पाहिजे की आपल्या शिक्षकांकडून आपण खूप घ्यायला हवं. आपण संपादन केलेले ज्ञान आपण विद्यार्थ्यांमध्ये रुजवले पाहिजे. ज्यावेळी महापूर अथवा भरपूर पाऊस पडतो त्यावेळी पावसाच्या पाण्याचा प्रवाह हा कोणासाठी थांबला का? त्याला दिसेल त्या मार्गाने तो निघून जातो. काळानुसार आपण बदलत राहिले पाहिजे त्यासाठी आपली मानसिकता बदलणं अत्यंत गरजेचे आहे. डायनोसॉर सारखे महाकाय प्राणी परिस्थितीशी जुळवून न घेतल्यामुळे ते नष्ट झाले. झुरळासारखे प्राणी अजूनही टिकून आहेत. चांगल्या चांगल्या आयडिया कृतीत आणणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन मॅजिक बिझनेस इनक्यूबेटरचे संचालक श्री.रितेश मिश्रा यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या समारोपप्रसंगी बोलत होते. दि. १० ते १२ मार्च दरम्यान हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये इंडस्ट्री तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी विविध बाबींवर मार्गदर्शन केले गेले. विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देणे, विविध समस्यांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे, तसेच विद्यार्थ्यांना नवकल्पनांकडे प्रेरित करणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.दि. १० मार्च रोजी अनिल मोहगावकर, संजय कुलकर्णी यांनी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना विकसित करण्यासाठी विविध उपाययोजना व अध्यापन पद्धतींबाबत माहिती दिली. प्रशिक्षण कार्यक्रमात नवोन्मेषी अध्यापन व अध्ययन पद्धती, विद्यार्थ्यांसाठी डिझाईन थिंकिंग व कल्पना निर्मिती, कोर्स आउटकम व प्रोग्राम आउटकम, प्रभावी अध्यापनासाठी ई-कन्टेंट विकास, विद्यार्थी प्रकल्पांपासून स्टार्टअपपर्यंतचा प्रवास, आधुनिक वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग समजून घेणे या विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी प्रसिद्ध उद्योजक तथा मॅजिकचे संचालक सुनील रायठठ्ठा यांनी व्यक्तीच्या जीवनातील गुरुचे महत्त्व अधोरेखित करत उद्योजकीय क्षेत्रातील स्वत:चे अनुभव कथन केले.दि. ११ मार्च रोजी प्राचार्य डॉक्टर गणेश शैक्षणिक धोरण आणि त्या अनुषंगाने अभ्यासक्रमाची रचना आवश्यक असणारे घटक आणि शिक्षकांच्या जबाबदारी याविषयी सविस्तर माहिती दिली. नव्या शैक्षणिक धोरणामुळे झालेले बदल याचा आढावा घेतला आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम कशी राबवावे या संदर्भात मार्गदर्शन केले.दुपारच्या सत्रात रंजन प्रसाद यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे विविध अॅप याविषयीची माहिती देऊन त्याचा उपयोग कसा करायचा हे कृतिशीलरित्या शिकवले. आपण हाती घेतलेले उपक्रम अधिकाधिक उत्तम रीतीने कशी बनवावे. त्यात नेमकेपणा कसा आणावा यासाठी एआय तंत्रज्ञान हे मानवी विकासासाठी महत्त्वाचे ठरते असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विविध उदाहरणाच्या माध्यमातून ऐआय कशा रीतीने आपल्या कल्पनांना वास्तवात आणते याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. नवतंत्रज्ञान आपलं जगणं सुकर करते. याची भीती न बाळगता आपण सुसंपन्न कसे बनवू हे आपण बघितलं पाहिजे असे ते म्हणाले.आज १२ मार्च रोजी सकाळच्या सत्रात श्री. मकरंद कुलकर्णी यांनी भारतातील 'जेन-झी' म्हणजेच तरुण पिढी ही प्रचंड विशाल, अस्वस्थ आणि हायपर-कनेक्टेड असून या पिढीशी सुसंवाद कसा करावा त्यांचे शिकण्याचे वर्तन आणि त्यांचा वर्गखोल्यातील सहभाग याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. कविता प्राशर, डॉ. भूषण नाफडे, कोर्स समन्वयक डॉ. सुनीता भराडे, डॉ. प्रेरणा रामटेके व डॉ. रामेश्वर म्हस्के, डॉ. प्रियदर्शन भवरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, मॅजिकचे कार्यकारी अधिकारी मकरंद कुलकर्णी, जनरल मॅनेजर देविदास राठोड, मॅनेजर शशिकांत तिवारी व कर्मचारी कृष्णा शिंदे कार्यक्रमास उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ मार्च २०२६

# रिसर्च क्लबतर्फे विविध क्षेत्रांतील महिलांच्या योगदानाचा अभ्यासपूर्ण वेध




**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या रिसर्च क्लबतर्फे “Breaking Barriers : Contribution of Women in Every Field” या संकल्पनेवर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या उपक्रमातून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या योगदानाचा अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला.या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण १४ विभागांतील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत या भाषा विभागांसह मानसशास्त्र, गृहशास्त्र, संगीत, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, क्रीडा, वाणिज्य आणि बीसीए विभागातील विद्यार्थिनींचा यात समावेश होता. प्रत्येक विद्यार्थिनीने आपल्या विषयाशी संबंधित एका उल्लेखनीय महिलेचे विविध क्षेत्रांतील योगदान पाच मिनिटांत प्रभावीपणे सादर केले. इंग्रजी साहित्यातील लेखिका, मराठी साहित्यातील ज्योती मापसेकर तसेच मानसशास्त्र क्षेत्रातील डॉ. ॲना फ्रॉइड यांसारख्या महिलांच्या कार्याची माहिती विद्यार्थिनींनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडली.या स्पर्धेच्या परीक्षक म्हणून महाविद्यालयाच्या ग्रंथपाल ज्योत्स्ना जावळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिसर्च क्लब इन्चार्ज प्रा. डॉ. रजनी सेनाड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. डॉ. सुनीता बाजपेयी होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. अपर्णा सराफ उपस्थित होत्या.स्पर्धा काटेकोर नियमांनुसार पार पडली. प्रत्येक स्पर्धकाला पाच मिनिटांची वेळ देण्यात आली होती. आशय, संरचित मांडणी, वेळेचे व्यवस्थापन, भाषेवरील प्रभुत्व, भाषाशैली, सादरीकरण कौशल्य आणि एकूण प्रभाव या निकषांवर स्पर्धेचे मूल्यमापन करण्यात आले.स्पर्धेत कु. अंजली खिराडे यांनी प्रथम क्रमांक, कु. भार्गवी मोदी यांनी द्वितीय क्रमांक, तर कु. पायल शुक्ला यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थिनींना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले, तर सर्व सहभागी विद्यार्थिनींना प्राचार्या डॉ. सुनीता बाजपेयी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.महाविद्यालय स्तरावर विविध विषयांतील महिलांच्या योगदानावर आधारित माहिती सादरीकरण स्पर्धा आयोजित करून महिला दिन साजरा करण्याची ही सृजनात्मक संकल्पना मराठवाड्यात प्रथमच राबविण्यात आली. ही संकल्पना रिसर्च क्लब इन्चार्ज डॉ. रजनी सेनाड यांची होती.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सविता मनोहर आणि डॉ. अंजली पंडित यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी केले.

# धर्मवीर आनंद दिघे साहेब कल्याणकारी मंडळाची पात्र रिक्षा, मिटर टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी ऑनलाईन नोंदणी

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्य सरकारने ६५ वर्षावरील रिक्षा, मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. त्यासाठी पात्र रिक्षा, मिटर टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी ऑनलाईन नोंदणी सुरु झालेली आहे. पात्र रिक्षा, मौटर टॅक्सी परवानाधारक चालकांनी httpps://ananddighekalyankarimandal.org या संकेतस्थळावर नोंदणी करावी. ही नोंदणी मोबाईलच्या माध्यमातुन घरबसल्या अथवा कुठल्याही सायबर कॅफेत जाऊन करता येईल.अर्ज भरतांना अडचणी आल्यास या कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या मदत कक्षाशी संपर्क करावा.अटी -१) परवानाधारक चालक हा महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवाशी असावा.२) परवानाधारक चालक यांच्याकडे ५ वर्षे जुना परवाना असावा.३) रिक्षा, मोटर टॅक्सी वगळता त्याच्याकडे कोणतेही चारचाकी वाहन नसावे.लाभ -१) रिक्षा व मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ पुरविणे.२) ६५ वर्षावरील सभासद चालकांना निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सन्मान निधी दिली जाणार आहे. याबरोबरच कल्याणकारी मंडळाच्या सभासद चालकांसाठी विमा व आरोग्य योजना राबविण्यात येतील.

३) तसेच त्यांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना देखील राबविली जाणार आहे. कर्तव्यावर असतांना चालकास दुखापत झाल्यास त्याला कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातुन अर्थसहाय्य केले जाणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# भ्रमात जगतो माणूस

प्रत्येकाला वाटते,
सारे माझेच आहे.
कोणी नाही कुणाचा,
स्वार्थाने वाट पाहे.

भ्रमात जगतो माणूस,
जगाची रीत न्यारी.
ज्याला त्याला आहे,
आपलीच पोरं प्यारी.

काही दिल्यास त्याला,
म्हणतो खूपच भारी.
नाही दिल्यास काही,
उणे दुणे काढतो सारी.

मनासारखे वागल्यास,
पदरात घेणार चूक.
मनाविरुद्ध वागता,
धरणार सदैव डूक.

असा आहे माणूस,
स्वार्थाने भरभटलेला,
स्वत:च्या प्रसिद्धीसाठी,
सदा सर्वदा हपापलेला.

कामापुरते सारेच इथे,
बोलतात सदैव गोड
काम संपता म्हणतात,
त्याचा दोस्ताना सोड.

जिकडे पहा तिकडे,
दिसते भ्रमाचा भार.
निस्वार्थी माणूस इथे,
खातो व्यवस्थेचा मार.



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर
मो.नं.९७६३२८३७०४

# बंडूचे स्वप्न

नेहमी प्रमाणे एकदा
गाढ झोपला बंडू
स्वप्नात आल्या फळभाज्या
लागल्या त्याला भांडू

गोल गोल आकाराचे
रागावून म्हणाले बीट
रक्त वाढते माझ्यामुळे
खात जा मला निट

एकत्र येऊन बोलला
गाजर नि मुळा
आम्हाला तू खात नाही
किती रे तू खुळा ?

कारले म्हणाले
चव माझी कडू
म्हणून का रे येते
मला पाहून रडू ?

लाल टोमॅटो म्हणाले
ताटात असाव्यात फोडी
जेवतांना येते मग
न्यारीच गोडी

काकडी,कोबी म्हणाल्या
खात जा आमची कोशिंबीर
विविध जीवनसत्त्व आमच्यात
नको जेवतांना किरकिर

जाग आल्यावर बंडू
थोडा गोंधळून गेला
हात पाय धुवून
जेवायला बसला

ताटातील सर्व भाज्या
बंडूने केल्या फस्त
गोड हसत म्हणाला
जेवण झाले मस्त



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ मार्च २०२६


## "पाणपोई" कवितासंग्रहाचे फ. मु. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : संभाजीनगर येथील फ. मु. शिंदे यांच्या निवासस्थानी येथे नुकतेच अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " पाणपोई " या बाल कवितासंग्रहाचे छोटेखानी कार्यक्रमात प्रकाशन करण्यात आले. यावेळी कविवर्य प्रा. फ. मु. शिंदे म्हणाले, " ऐन उन्हाळ्याच्या हंगामात शितल पाणपोई चे प्रकाशन होत आहे. सर्वसामान्य व्यक्तिचे थंडगार पाण्याने तहान तृप्त करणारी पाणपोई हा कवितासंग्रह नक्कीच सर्वांना वाचण्यासारखे आहे. कारण नेहमीच मराठवाडा हा पाण्यासाठी तहानलेला असतो. त्यामध्ये अय्युब पठाण सारख्या कवीने पाणपोई कवितासंग्रहाची रचना करून नक्कीच वाचकांची तहान ही शितल शब्दांनी तृप्त केली आहे." कवी अय्युब पठाण यांचे हे सोळावे पुस्तक आहे. याप्रसंगी मुदस्सर पठाण, सुरेश शिंदे, अफरोज पठाण, आणि सुधाकर शिंदे हे प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित होते.

## पवित्र रमजान

चांदण्याच्या कोमल प्रकाशात
रमजानचा महिना येतो,
श्रद्धा, संयम आणि करुणेचा
सुंदर संदेश देऊन जातो.

पहाटेची सहरी घेऊन
मन प्रार्थनेत गुंतते,
दिवसभर संयम पाळत
आत्मा शुद्ध होत राहते.

भूक, तहान सहन करत
मनात श्रद्धेची ज्योत पेटते,
गरीबांच्या वेदना समजून
माणुसकीची वाट फुलते.

इफ्तारच्या त्या क्षणी
आनंदाची लहर पसरते,
खजूराच्या गोड चवीत
बंधुभावाची मिठी उमलते.

जकात, फित्राच्या दानातून
करुणेचा दीप उजळतो,
रमजानचा पवित्र महिना
मानवतेचा संदेश देतो.

प्रार्थना, प्रेम आणि शांती
यांची सुंदर शिकवण देतो,
मनामनात बंधुभावाची
नवी पहाट उजळून टाकतो.



**कवि - भगवंत पाळवदे,**
**अंबाजोगाई**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## मोडीलीपी अभ्यासकांसाठी परिपुर्ण मार्गदर्शक 'मोडी लिपी - एक ऐतिहासिक वारसा'

ऐतेहासिक मोडीलिपी ला खुप मोठा ईतिहास आहे. असे म्हणतात की 12 व 13 व्या शतकात ऐतिहासिक यादव साम्राज्याने देशा ला केवळ उत्तम शासन, विशाल गडकिल्ले, मंदिरे, शिल्पच दिले नाहीत. तर या काळात यादवांनी तीन गोष्टी श्रीलंके हून भारतात आणल्या त्या म्हणजे हेमाडपंथी शिल्पकला, बाजरी धान्य, मोडीलीपी, पुढे या गोष्टी इतक्या जनमानसात रुजल्या ही त्या आज पर्यंत आपल्या जिवनमानात टिकून आहेत. देवनागरी लिपी जरी यादवांची प्रमुख लिपी असली तरी हेमाद्री पंडीताने मोडीलीपी ला राजवैभव प्राप्त करुन देत राजलिपी बनविले, पुढे शिवकाळ, पेशवाई, इंग्रज शासन, स्वतंत्र भारत या काळात ही मोडीलीपी राजलिपी बरोबरच व्यवहारिक लिपी म्हणून टिकून राहिली. छपाई साठी अडचणी येत असल्याने मोडीलीपी मागे पडली, परंतू इतिहासप्रेमी, अभ्यासकांच्या मनात ती आज पर्यंत टिकून राहिली, शासन दरबारी आज ही मोडीतील लाखो दस्त धुळखात पडुन आहेत. मोडी वाचकांची संख्या खुप कमी असल्या मुळे महाराष्ट्र शासनाने तीचे महत्व लक्षात घेऊन पुराभिलेख संचालनालया च्या वतीने प्रशिक्षण वर्ग सुरु केले. अलीकडे मराठा आरक्षण लढ्यामुळे पुन्हा मोडी चे महत्व सर्वसामान्य लोकांत ही प्रकर्षाने जाणवू लागले. त्यामुळे मोडीलीपी कडे पुन्हा सरकारचे लक्ष वेधल्या गेले. तर इतिहासप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थ्यांत ही जिज्ञासा निर्माण झाली. आमच्या आजोबांच्या जूण्या दफ्तरांत अनेक मोडीलिपी तील कागदपत्रे होती. त्यात नेमके काय लिहीलय हे जाणून घेण्याच्या कुतूहलातून मी मोडीलीपी अभ्यासाकडे कडे वळालो आणि मिळेल त्या मार्गाने मोडीलीपी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. यासाठी मोडीलिपी व प्रचीन लिपी चे तज्ञ व अभ्यासक श्री पांडुरंग सरकटे सरांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले. अशातच श्री सरकटे सर लिखीत 'मोडी लिपी- एक ऐतिहासिक वारसा' हे पुस्तक वाचणात आले. खरे म्हणजे मला या पुस्तकाची खुप उत्कंठा होती. सरांकडूनच मी मोडीलीपी चे धडे घेतले. सरावां मुळे मोडीलीपी आत्मसात करण्यात मोठी मदत झाली, सरांकडून रेघी हिशोब पध्दत अतिशय सोप्या पध्दतीने शिकता आली. त्यामुळे सरांचे पुस्तक ही माझ्या सह नवोदित मोडीलीपी अभ्यासकां साठी एक मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. अतिशय मेहनत व एकाग्रतेने लिहीलेले हे पुस्तक,संदर्भ प्रकाशन संभाजीनगर यांनी पुस्तकाची रचना सुबक आकर्षकपणे केली आहे. दिपक भद्रे स्वराज ग्राफिक्स ने मुखपृष्ठ आकर्षक व ऐतिहासिक दस्तांनी सजविले आहे. प्रस्तावनेत श्री सरकटे सरांनी मोडी लिपी चा ईतिहास विस्तृतपणे मांडला आहे. यादव कालखंड, शिवकाल, पेशवाई, इंग्रज ते स्वातंत्र्यपूर्व काळ ते आधुनिक काळ यांत मोडीचे व्यवहारिक महत्व अधोरेखित केले आहे. प्रसिद्ध वक्ते विठ्ठल कांगणे यांनी आपल्या अभिप्रायात मोडी चे महत्व विशद करीत शुभेच्छा दिल्या आहे. सर हे स्वता एक प्राचीन लेणी, शिल्प अभ्यासक, आदर्श शिक्षक, प्रशिक्षक असल्याने,पुस्तकातील 01 ते 13 धड्यांत मोडीलिपीतील 14 स्वर, 38 व्यंजने, ऱ्हस्व, दिर्घ वेलांटी, उकार, आकार, मात्रा, काना, अनुस्वार, विसर्ग, आदींची आकृती सह स्वहस्तलिखीत मांडणी केली आहे. सरावा साठी भरपूर शब्द संग्रह, धडे, कविता, मोडी मोडी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुण दिला आहे. शिवाय स्वअभ्यासासाठी छोटेखानी पाठ दिले आहेत. मोडीलिपीत महत्वाचा मनोरंजक घटक असलेल्या 'र' 'ड' या शब्दांची 'करामत' उदाहरणांसह समजावून सांगितली आहे. 16 व्या पाठात मोडीलीपी जलद व लपेटदार लिखाणा साठी आवश्यक असलेल्या 'शब्द संक्षेप' ची माहिती दिली आहे. ऐतिहासिक दस्तावेजांत संक्षेप शब्दांना अतिशय महत्व होते. या शब्दां वरुण दस्त लिहीणारा व ज्यांना लिहीला आहे. त्यांचे स्थान ओळखण्यासाठी या संक्षेपकांचा वापर केल्या जात. त्याच बरोबर या पाठात शब्दांच्या आरंभी च्या अक्षरां पुढील दोन रेषा, यांची माहिती दिली आहे. ऐतिहासिक मोडी दस्तांत कागदपत्रांचे अनेक प्रकार होते. उदा:- दफाते पत्रे, इनाम पत्र, वतन पत्र, रसानगी यादी, फेरिस्त, वकिलनामा, आज्ञापत्र, मसाले पत्र, आदी 25 प्रकारच्या कागदपत्रांची व्याख्या व माहिती 17 व्या पाठात दिली आहे. 18 व्या पाठात मोडी मायन्यांतील शब्द सराव दिले आहेत. त्यामुळे नवोदितांना सरावा साठी मोठा शब्द संग्रह उपलब्ध झाला आहे. मोडीलीपी चा अभ्यास केवळ शब्द, वाक्य रचना लेखन वाचना पुरता मर्यादित नाही. दस्तांची कालगणना ही तितकीच महत्वाची असते. यात हिंदु कालगणनेत विक्रम संवत, शालिवाहन शक, संवत्सरे, सातवार व त्यांची जूनी नावे, मुस्लिम कालगणनेत हिजरीसन, फसलीसन, शुहूर(अरबी)सन, इलाहीसन, जुलूससन, या कालगणनांची सविस्तर माहिती दिली आहे. शिवाय या कालगणनांचे इसवी सणात रुपांतर करण्याचे गणित समजावून सांगण्यात आले आहे. तसेच संबंधित दस्त कोणत्या कालखंडातील आहेत. हे ओळखण्याची माहितीही या पाठात सविस्तर देण्यात आली आहे. ऐतिहासिक कागदपत्रांत आर्थिक व्यवहार हे 'रेघी हिशोब' पध्दतीने मांडल्या जात उदा. पै, पैसा, आना, रुपया, तर धान्य, पीठ, तेल आदी मोजमाप हे पाव, सव्वापाव, पाऊन, अर्धा पाव, शेर, पायली, खंडी,मण, एक अशा परिमाणात, जमिन साखळी, गज, बिघा, पांड, आदी परिमाणात मोजल्या जात याची माहिती 20 व्या धड्यात देण्यात आली आहे. 21 व्या धड्यात विविध दप्तरखाने व त्यांत उपलब्ध असलेले जुने मोडी दस्त यांची माहिती दिली आहे. 22 व्या धड्यात मोडी अंक उजळणी दिली आहे. असे म्हणतात की मोडीलीपी लेखन पध्दत व्यक्तीपरत्वे बदलत त्यामुळे बरीचशे अक्षरे ही वेगवेगळ्या पध्दतीने लिहील्या जात. अशा शब्द अक्षरांची माहिती 23 व्या पाठात दिली आहे.त्या मुळे हे पुस्तक नवोदित मोडीलीपी अभ्यासकांसाठी व पुराभिलेख संचालनालय च्या वतीने घेतल्या जात असलेल्या परिक्षितार्थी साठी एक परिपुर्ण मार्गदर्शक ठरेल त्यामुळे हे पुस्तक आवर्जून अभ्यासावे व परिपुर्ण ज्ञान आत्मसात करावे. श्री सरकटे सरांच्या आगामी संशोधन, लेखनास मनपूर्वक शुभेच्छा.



**- अरुण थोरात**
(ईतिहास व मोडीलिपी अभ्यासक)
कन्नड


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ मार्च २०२६


## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन




**बीड (भगवंत पाळवदे) :** दि. 12 :- आखाती देशातील युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या असून पेट्रोल, डिझेल व घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा जिल्ह्यात सुरळीत सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली.इंधनाबाबत तुटवडा निर्माण होण्याची भीती दाखवून काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त पैसे घेणे, गॅसचा साठा करून ठेवणे तसेच घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर केल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पेट्रोल, डिझेल आणि गॅस कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत आढावा बैठक घेतली. यावेळी इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅसचे सुरळीत वितरण तसेच अवैध वापर रोखण्यासाठी १९ पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांनी गॅस एजन्सींना वेळोवेळी भेट देऊन ग्राहकांशी संपर्क साधण्याचे तसेच कोणतीही अडचण असल्यास जिल्हा नियंत्रण कक्षास कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या पथकांनी आतापर्यंत २०३ आस्थापनांची तपासणी केली असून १३ ठिकाणी घरगुती गॅसचा अवैध वापर आढळून आला आहे. तसेच २८ सिलेंडर जप्त करण्यात आले असून ३ प्रकरणांमध्ये पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अन्य १० प्रकरणांत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.दरम्यान, पेट्रोल, डिझेल व गॅसच्या सुरळीत वितरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या समन्वयाने नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नागरिकांनी कोणतीही तक्रार असल्यास टोल फ्री क्रमांक १०७७ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.बीड जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

## निरगुडी बु ठाकरवाडी लघु प्रकल्पात अचानक मासे मेल्याने परिसरात भीतीचे वातावरण





**खुलताबाद (सनिराम गावंडे)** निरगुडी बु ठाकरवाडी या लघु प्रकल्पात अचानक मासे मेल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे दिनांक १२ मार्च २०२६ रोजी गुराख्यांनी मासे मेलेले बघितल्यानंतर संध्याकाळी ठाकरवाडीत, परिसरात मासे कशाने मेले असतील अशी चर्चा सुरू झाली.शुक्रवारी सकाळी गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी तिथे जाऊन पाहणी,चौकशी केली तर त्यांच्यामध्ये कुणीतरी काहीतरी औषध,ब्लिचिंग पावडर टाकण्याची शंका निर्माण झाली शंका अशी निर्माण झाली की, गॅस पाईप द्वारे अवैध पाणी उपसा चालू आहे तर त्या गॅस पाईपमध्ये मासे अडकतात व गॅस द्वारे जाणारे अवैध पाणी थांबते त्यामुळे गॅस पाईप धारकांनी मासे मारण्यासाठी ब्लिचिंग पावडर टाकली आहे अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. त्यानंतर ग्रामपंचायत ऑपरेटर दीपक चांडे यांना बोलावून घेतले त्यांनी सुद्धा पाहणी केली तर त्यांनी मत्स्य विभागाला फोन करून कळविले व स्वतः येऊन त्यांनी पाहणी केली असता त्यांनी असे सांगितले की,अचानक उष्णता वाढल्या कारणामुळे बऱ्याच धरणात असा प्रकार आढळून आला आहे त्यामुळे भीतीचे काही कारण नाही असे त्यांनी सांगितले आहे.पण पाण्याची कितीही पातळी कमी असली तरी उष्णतेने माशांना काहीच होत नाही मासे उष्णतेमुळे मरूच शकत नाही दरवर्षी सुद्धा या धरणात पाण्याची पातळी ही खुप कमी असते आणि उन्हाचा पारा हा ४०°c असतो तरीही मासे मरत नाही परंतु सद्याचा पाणीसाठा हा साधारणतः ८० ते ८५ टक्के आहे तर इतक्या खोल पाण्यात मासे उष्णतेमुळे मरू शकत नाही असे गावकऱ्यांनी स्पष्ट मत व्यक्त केले.

## अंजीर फळबागेला विमा संरक्षण मिळावे यासाठी कृषी मंत्र्याशी करणार चर्चा - निलेश हेंलोडे



**दौलताबाद (जावेद अहमद) :** मौजे माळीवाडा येथे अॅड निलेश हेलोंडे पाटील. राज्यमंत्री दर्जा अध्यक्ष कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांनी बुधवार ११ मार्च रोजी बुधवार रोजी दौलताबाद परिसरातील. अंजीर फळबाग संदर्भात माहिती जाणून घेतली , यावेळी माळीवाडा येथील अंजीर फळबाग धारक शेतकरी सुरेंद्र जगधने यांचे शेतावर भेट दिली भेटीदरम्यान शेतकऱ्यांशी अंजीर फळबागाच्या संदर्भात सविस्तर अशी माहिती फळ बागेसाठी लागणारी जमीन , औषधे, विविध फवारणी , बाजार भाव जवळी बाजर पेट आदी विषयांवर सविस्तर माहिती जाणून घेतली , अंजीर प्रोसेस करण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले, समृद्धी महामार्ग आपल्या गावाच्या जवळून जात असल्याने आपण आपल्या इथे पिकवलेले ताजे अंजीर आपण मुंबई नागपूर या सह मोठ्या शहरात विक्रीसाठी घेऊन जाऊन आपल्या उत्पन्नात वाढ करावी आसे हि सांगितले. दौलताबाद केसापुरी केसापुरी तांडा अब्दिमंडी रामपुरी, शरणापुर या परिसरात माळीवाडा या परिसरात जाऊन जवळजवळ ३०० हेक्टर पर्यंत अंजीर फळबाग लागवड आहे. परंतु सदर पिकाला विमा संरक्षण नाही. त्यासाठी कही करता येईल का विमा संरक्षण मिळावे आशी मागणी हि शेतकऱ्यांनी केली . यावर त्यांनी सांगितले की या बाबद सविस्तर माहिती घेऊन कृषी मत्र्याशी चर्चा करुन विमा संरक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करु . यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ, उप कृषी अधिकारी योगेश दिवेकर, ग्रामविकास अधिकारी, गोरखनाथ चव्हाण, तसेच माळीवाडा उपसरपंच मनेश गाजरे, माजी उपसरपंच कडूभाऊ कीर्तिकार ,नंदकिशोर मुळे, ग्रामपंचायत सदस्य धम्मपाल गायकवाड, प्रवीण बर्डे, प्रगतशील शेतकरी धोंडीराम जगधने वैजनाथ मुळे विलास जाधव, सुनील मुळे आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

## ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**बाजार सावंगी :** ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री तसेच थोर विचारवंत, साहित्यिक स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री झिंजूर्के सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. यावेळी प्रा. राणे सर, श्रीमती पारनेरे मॅडम, प्रा. पवार सर, प्रा. राठोड सर, श्रीमती कुलकर्णी मॅडम, प्रा. चव्हाण सर, प्रा. पाटील सर, प्रा. गायकवाड सर, श्रीमती जाधव मॅडम,प्रा. गाडेकर सर,प्रा. कुवारा सर,श्री. जाधव सर, श्री. कोलते सर, श्री. जाधव सर उपस्थित होते.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |